वडाळा येथील मुंबई पोर्ट ट्रस्ट रुग्णालयाच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री. सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली होती, त्याप्रसंगी उपस्थित ज्येष्ठ कामगार नेते ॲड. एस.के. शेट्ये, मुंबई पोर्ट ट्रस्टचे विश्वस्त सुधाकर अपराज, मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी सर्वश्री विद्याधर राणे, विजय रणदिवे, विकास नलावडे, संदीप कदम, तसेच शीला भगत, निशा बोरगावकर.

विक्रमगड तालुक्यात श्रमजीवी संघटनेला रामराम ठोकून १०० कार्यकर्त्यांचा लाल बावट्यात उत्साहाने प्रवेश

■ **विक्रमगड**

रविवार, १ नोव्हेंबर रोजी पालघर जिल्ह्याच्या विक्रमगड तालुक्यातील उपराळे गावात झालेल्या जाहीर सभेत, १०० हून अधिक कार्यकर्त्यांनी श्रमजीवी संघटनेला रामराम ठोकून लाल बावट्यात प्रचंड उत्साहाने प्रवेश केला. विविध रास्त कारणांमुळे त्यांचा श्रमजीवी संघटनेबद्दल भ्रमनिरास झाला होता.

त्या सर्वांना लगेच योग्य त्या जनसंघटनेचे काम दिले जाईल. किसान सभेची १,००० हून अधिक सभासदनोंदणी त्यांनी पूर्णही केली आहे आणि जनवादी महिला संघटना व डीवायएफआय ची नोंदणी ते सुरू करणार आहेत. त्या सर्वांचे राजकीय अभ्यास शिबिर दिवाळीनंतर लगेच घेतले जाणार आहे.

कैलास तुंबडा, विलास झोप, हिराबाई जाधव, विजय पाटील आणि सुनीता मोहंडकर हे लाल बावट्यात काल प्रवेश करणारे प्रमुख कार्यकर्ते आहेत. त्यांचे व इतर अनेक कार्यकर्त्यांचेही या प्रसंगी लाल स्कार्फ व लाल टोप्या घालून पक्षाच्या नेत्यांनी हार्दिक स्वागत केले. त्यात आदिवासी आणि कुणबी या दोन्ही समाजाचे कार्यकर्ते आहेत हे विशेष.

पक्षाच्या जिल्हा नेतृत्वाला विश्वासात घेऊन माकपचे राज्य कमिटी सदस्य आणि विक्रमगड तालुका सचिव किरण गहला हे गेले तीन महिने कैलास तुंबडा यांच्या नेतृत्वाखालील या नवीन कार्यकर्त्यांच्या संपर्कात होते.

राजा गहला अध्यक्षस्थानी असलेल्या या समारंभास व जाहीर सभेस डॉ. अशोक ढवळे, बारक्या मांगात, मरियम ढवळे, आमदार विनोद निकोले, किरण गहला, लक्ष्मण डोंबरे, नंदू हाडळ, चंद्रकांत घोरखाना, भरत वळंबा, अमृत भावर, चिंतू कानल, विलास गहला, भास्कर म्हसे, दत्तू खराड यांनी संबोधित केले. लाल बावटा जिंदाबाद! मोदी सरकार मुर्दाबाद! इन्कलाब जिंदाबाद! च्या जोरदार घोषणांत या जोरदार सभेची सांगता झाली.

महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे ५ ते ७ नोव्हेंबर या कालावधीत चर्चासत्र

■ **मुंबई**

महाराष्ट्र हे भारतीय चित्रपट सृष्टीचे जन्मस्थान असून चित्रपट व करमणूक माध्यमांच्या क्षेत्रात कायमच अग्रेसर राहिले आहे. या अनुषंगाने प्रस्तावित चित्रपट, मनोरंजन व माध्यम धोरण असावे या मुख्य उद्देशातून महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडून दिनांक ५ ते ७ नोव्हेंबर २०२० या कालावधीत 'पॅनोरमा इन्वीशनिंग फिल्म मीडिया अँड एन्टरटेनमेन्ट पॉलिसी फॉर महाराष्ट्र' या विषयावर तीन दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी दिली.

उद्या दुपारी साडे बारा वाजता सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या उपस्थितीत ऑनलाईनद्वारे उद्घाटनपर सत्र सुरू होणार आहे. हे चर्चासत्र फेसबुक लाइव्ह व यूट्यूब च्या माध्यमातून सर्वांसाठी खुले राहणार आहे.या सत्राचा उद्देश या क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रस्थान बळकट करणे, राज्य चित्रपट निर्मिती आणि मनोरंजन माध्यम केंद्र प्रस्थापित करणे आणि या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाला चालना देणे असे असेल.

चित्रपट व करमणूक माध्यम क्षेत्र गतीमान व्हावे यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या वेबिनारमध्ये राज्याची जागतिक स्तरावरील चित्रीकरण केंद्र बनविणे, चित्रपट माध्यम व करमणूक क्षेत्रास उद्योगाचा दर्जा देणे,चित्रपट माध्यम व करमणूक क्षेत्राच्या वाढीसाठी सकारात्मक वातावरण उपलब्ध करून देणे, चित्रपटसृष्टीशी निगडित पर्यटन आणि त्याचे फायदे यांचा अभ्यास करणे, प्रादेशिक चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देऊन चित्रपट, माध्यम व करमणूक क्षेत्रातील कौशल्य विकास वृद्धिंगत करणे यासारख्या सर्वांगीण विषयांचा समावेश असेल.

या चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे,केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर,सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख, सांस्कृतिक कार्य विभागाचे राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर तसेच संपूर्ण चित्रपट सृष्टी व उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि अनेक नामवंत तज्ञ मंडळी सहभाग घेणार आहेत.

गोखिवरे येथील जि.प. शाळेचे बांधकाम रखडले विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याचा धोका

शाळेचे बांधकाम तात्काळ दुरूस्त करा - माजी नगरसेविका शिल्पा सिंग

■ **वसई**

सध्या लॉकडाऊन काळात वसईतील जिल्हा परिषद शाळा बंद असल्याने त्यांची दुरावस्था झाली आहे. बऱ्याच ठिकाणी जिल्हा परिषदेच्या शाळा मोडकळीस आल्याने त्या दुरूस्त करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. वसई पूर्वेतील गोखिवरे येथील जानकीपाडा जिल्हा परिषदेच्या शाळेची वास्तू मोडकळीस आल्याने त्याठिकाणी नवी इमारत तातडीने उभी करण्यात यावी, अशी मागणी महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ७७च्या माजी नगरसेविका शिल्पा सरोजकुमार सिंग यांनी केली आहे. शाळेची वास्तू उभारण्यास होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित धोक्यात आले आहे.

गोखिवरे (जानकीपाडा) येथील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेची इमारत मोडकळीस आल्याने सदरची इमारत ही धोकादायक असल्याचे जाहीर करत वसई-विरार शहर महानगरपालिकेने शाळेस नोटीस पाठवून भाग काढून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदर इमारतीचा स्लॅब/छत लिकेज असून ते फार कमकुवत झाले आहे. इमारतीचे प्लास्टर निखळून खाली पडत आहे. तसेच इमारतीच्या भिंतीलाही तडे गेले असल्याचेही वसई-विरार शहर महापालिकेने म्हटले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून याकडे पालघर जिल्हा प्रशासनाने वेळीच लक्ष दिले असते तर ही भयावह परिस्थिती उद्भवली नसती, अशी प्रतिक्रिया शिवसेनेच्या माजी नगरसेविका शिल्पा सिंग यांनी दिली आहे. विशेष बाब अशी की, जिल्हा परिषदेच्या या शाळेत शिक्षण घेत असलेल्या सुमारे ४५० हून अधिक आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य यामुळे धोक्यात आल्याने या शाळेची तातडीने दुरूस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे मत शिल्पा सिंग यांनी बोलताना व्यक्त केले. सध्या लॉकडाऊन काळ असल्याने राज्यभरातील शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. या वेळेत शाळेच्या मोडकळीस आलेल्या इमारतीचा भाग पाडून त्याठिकाणी नवीन बांधकाम करून घ्यावे, अशी मागणी शिवसेनेच्या माजी नगरसेविका शिल्पा सिंग यांनी जिल्हाधिकारी पालघर तसेच पालघर जिल्ह्याच्या शालेय विभागाकडे केली आहे.

पतपेढी क्रेडिट सोसायटीकडून शिक्षक सभासदांना दिवाळीपूर्वी मिळणार दिवाळीपूर्वी लाभांशाची रक्कम

प्रतिनिधी

■ **मुंबई**

सन २०१९-२०ची वार्षिक सभा न होता शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतपेढी क्रेडिट सोसायटीकडून शिक्षक सभासदांना दिवाळीपूर्वी राज्यातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभांश रक्कम मिळणार आहे. ही रक्कम मिळावी यासाठी ७ ऑगस्ट २०२० पासून सतत महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना मुंबई चा पाठपुरावा सुरू होता.

सहकार व पणन विभाग मंत्री बाळासाहेब पाटील, सहकार विभाग राज्यमंत्री विश्वजित कदम, कोकण विभाग शिक्षक आमदार बाळाराम पाटील, सहकार आयुक्त अनिल कवडे, अप्पर निबंधक, पुणे यांना मागणी निवेदन पाठवून कोरोना संक्रमण काळ लक्षात घेता वार्षिक सभा न घेता लाभांश सभासद सदस्यांना वितरित करण्याचा अधिकार संचालक मंडळांना देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली होती.

बुधवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत वार्षिक सभा न घेता लाभांश वितरित करण्याचा अधिकार शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतपेढी क्रेडिट सोसायटी संचालक मंडळांना देण्यात आला. ०२.११.२०२० रोजी राज्यपालांनी चालू वर्षी सहकार कायद्यात सुधारणा करून संचालक मंडळाचा निर्णय घेऊन लाभांश वाटपाची परवानगी दिली आहे. त्यानुसार दिवाळी सणापुर्वी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभांश मिळणार असून मुंबईतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यावर लाभांश जमा करण्यात येणार आहे, काही जिल्ह्यात रोखीने लाभांश मिळणार असल्याची माहिती मुंबई अध्यक्ष तानाजी कांबळे यांनी यावेळी दिली.

शिक्षकांना लाभांश मिळावा म्हणून कोकण विभाग शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना मुंबई आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे त्याचे आभार मानण्यात आले.

शिक्षक व विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी मिळणार! शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड

■ **मुंबई**

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणातून दिवाळीची सुट्टी मिळणार आहे अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देशात ऑनलाईन शिक्षण पद्धती अवलंब करण्यात येत आहे. शालेय विद्यार्थी, शिक्षक व पालकही अव्याहतपणे अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत गुंतले आहेत व त्यांनी शाळा बंद असल्या तरी शिक्षण चालू ठेवले आहे.

शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांसाठी परंपरागत पध्दतीने मिळणारी सुट्टी या वर्षीही देण्यात येणार आहे व त्या संबंधिचा निर्णय लवकरच घेण्यात येईल असे प्रा. गायकवाड यांनी आज माध्यम प्रतिनिधींसोबत अनौपचारिक चर्चा करतांना सांगितले.

अकरावी महाविद्यालय प्रवेश संदर्भात मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे, महाधिवक्ता व संबंधित यंत्रणेशी चर्चा करून लवकरच अकरावी महाविद्यालयाच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा केला जाईल. कॉलेज सुरू व्हावे अशी सर्वांचीच इच्छा आहे. न्यायालयाच्या प्रक्रियेमुळे विलंब होतो आहे परंतु ऑनलाईन अकरावी वर्गाला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आहे या बद्दल प्रा. गायकवाड यांनी समाधान व्यक्त केले.

शाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळीच्या काळात कोणत्याही परीक्षांचे आयोजन करू नये अशा सूचनाही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक रूची वाढावी व त्यांचे ज्ञानभांडार समृद्ध करण्यासाठी शिक्षण विभाग प्रयत्नशील राहील असा विश्वास प्रा. गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.

मुंबई मराठी अध्यापक संघातर्फे आयोजित अभिवाचन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ **मुंबई**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉक्टर ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाप्रित्यर्थ मुंबई मराठी अध्यापक संघाने राज्यातील शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी अभिवाचन स्पर्धेचे आयोजन केले होते. प्राथमिक गट, माध्यमिक गट, उच्च माध्यमिक गट अशा तीन गटांत स्पर्धा घेण्यात आल्या स्पर्धेमध्ये ५५७ शिक्षकांनी सहभाग घेतला होता. प्राथमिक गटातून हनुमान नगर उ.प्रा.म्युनि. मराठी शाळा आर/ दक्षिण शाळेच्या आकांक्षा रमेश भोईर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. पश्चिम उपनगरे विभागाच्या उपशिक्षणाधिकारी सुजाता खरे मॅडम, अधीक्षक अशोक मिश्रा सर, आर/ दक्षिण विभागाच्या प्रशा. अधिकारी (शाळा) कल्पना संखे मॅडम, विभाग निरीक्षक गोविंद पारधी सर मुख्याध्यापक नंदकुमार संखे यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली कोरोना काळात अधिकारी वर्ग आपल्या शिक्षकांप्रती, विद्यार्थ्यांप्रती अतिशय सजग राहून त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांना वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या. या संधीमुळे अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळाल्याने विद्यार्थी व शिक्षकांमध्येही आनंदाचे वातावरण पसरले आहे.

या देशात भाजप समर्थकांना सात खून माफ आहेत का?

राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्ते तथा मंत्री नवाब मलिक यांचा सवाल

■ **मुंबई**

अन्वय नाईक यांच्या आत्महत्येत आरोपी असलेल्या अर्नव गोस्वामी यांच्या बचावासाठी केंद्रातील मंत्री येत असतील तर या देशात भाजप समर्थकांना सात खून माफ आहेत का? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी केला.

अन्वय नाईक आत्महत्या प्रकरणात रिपब्लिक टीव्हीचे अर्णब गोस्वामी यांना आज अटक झाल्यानंतर भाजपच्या केंद्रीय मंत्र्यांनी बचावासाठी केलेल्या वक्तव्याचा त्यांनी चांगलाच समाचार घेतला आहे.

आत्महत्या प्रकरणात आरोपीच्या बाजुने भाजपाचे केंद्रीय मंत्री ट्वीट करत असतील तर या देशाने मान्य करायचे का भाजप समर्थकांना सात खून माफ आहेत असे ट्वीट करून नवाब मलिक यांनी भाजपाला चांगलेच पेचात पकडले आहे.

बंदर व गोदी कामगारांना बोनस जाहीर

■ **मुंबई**

भारतातील प्रमुख बंदरातील २५९३९ बंदर व गोदी कामगारांना २०१९ - २० या वर्षाकरिता प्रचलित योजनेनुसार बोनस १९.०४ टक्के म्हणजे १५,९९४ रुपये देण्याचे आदेश केंद्रीय नौकानयन मंत्रालयाचे सचिन राजीव नयन यांनी काल सर्व पोर्ट ट्रस्टच्या अध्यक्षना दिले आहेत. बंदर व गोदी कामगारांना बोनस देण्याची मागणी अखिल भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघाचे (कामगार) अध्यक्ष ॲड. एस. के. शेट्ये व जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज यांनी केंद्रीय नौकानयन मंत्रालयाकडे केली होती.

केंद्रीय नौकानयन मंत्रालय व इंडियन पोर्ट असोसिएशनच्या आदेशानुसार मुंबई पोर्ट ट्रस्टच्या कामगारांना १९.०४ टक्के म्हणजेच १५९९४ रुपये बोनस (पी.एल.आर.) मिळणार आहे. बोनस देण्यासाठी पगाराची मर्यादा ७ हजार रुपये इतकी ठेवण्यात आली आहे. मुंबई बंदराप्रमाणे इतर बंदरामधील परादीप २० टक्के, विशाखापटणंम १८.१६ टक्के, चेन्नई १७. २७ टक्के, व्ही. ओ. चिदम्बरम १७. ५१ टक्के, कोचीन १९.५५ टक्के, न्यू मेंग्लोर १६.९५ टक्के, मार्मगोवा १४.४९ टक्के, जे. एन. पी. टी. १५.७४ टक्के, दीनदयाळ २० टक्के याप्रमाणे बोनस मिळणार आहे. मुंबई बंदरात ६४३० कामगार असून त्यांना बोनस वाटण्यासाठी १० कोटी २८ लाख रुपये खर्च येईल तर भारतातील प्रमुख बंदरातील बंदर व गोदी कामगारांना बोनस वाटण्यासाठी पोर्ट ट्रस्ट व्यवस्थापनाला ४० कोटी ९ लाख रुपये खर्च येणार आहे. असे मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे प्रसिद्धिप्रमुख मारुती विश्वासराव यांनी सांगितले.

वसई तालुक्यात बोगस पत्रकारांचा सुळसुळाट

४५० हून अधिक बोगस पत्रकारांमुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ धोक्यात

■ **वसई**

वसई तालुक्यात बोगस पत्रकारांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट वाढला आहे. तालुक्यातील अनधिकृत बांधकामं, गैरधंदे यांवरून संबंधितांना आणि प्रशासनाला लक्ष्य करत आहेत. आर्थिक वसुलीसाठी ही बोगस पत्रकारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून यात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय पत्रकारांची संख्या मोठी आहे. साधे बातमी बनवण्याचे तसेच पत्रकारिता म्हणजे नेमकी काय याचे शास्त्रशुद्ध आकलन नसलेल्या या बोगस पत्रकारांमुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ धोक्यात आला आहे. बोगस पत्रकारांच्या विकाऊ पत्रकारितेमुळे वसईतील पत्रकारितेचे शिक्षण घेतलेले, पदवी प्राप्त केलेल्या पत्रकारांची प्रतिमा मलीन होत आहे. पत्रकारितेचा ढाचा ढासळत असल्याने या बोगस पत्रकारांवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी वसईतील विविध वर्तमानपत्रांच्या पत्रकारांनी केली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामं फोफावत चालली आहेत. ही अनधिकृत बांधकामं लक्ष्य करून पालिका अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करणे, एखाद्या मोठ्या प्रकरणात संबंधितांवर कायदेशीर कारवाई म्हणून हेच बोगस पत्रकार पोलीस ठाण्यांत ठाण मांडून बसतात. पालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयांत सकाळपासूनच ठाण मांडून बसतात. तक्रार केलेल्या अनधिकृत बांधकामांवर पालिका अधिकाऱ्यांना कारवाई कधी करणार म्हणून हुज्जत घालत बसतात. तसेच आर्थिक वसुली केलेली अनधिकृत बांधकामं पालिकेच्या कारवाईपासून वाचावित यासाठी पालिकेवरच पुन्हा दबाव आणतात. बोगस पत्रकारांच्या या भलत्या-सलत्या पत्रकारितेमुळे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर घाला येऊ लागला आहे. वसई तालुक्यातील बोगस पत्रकारांची संख्या ४५० हून अधिक झाली आहे. हे पत्रकार वसई तालुक्यातील तसेच आजुबाजूच्या परिसरातून अनधिकृत बांधकामांच्या शोधात वसईत येतात. मिळालेल्या अनधिकृत बांधकामांच्या माध्यमातून आर्थिक वसुलीचा धंदा त्यांनी राजरोस मांडला आहे. बोगस पत्रकारांवर कोणतीच कारवाई होत नसल्याने लोकशाहीचा चौथा बुरूज ठासळू लागल्याची खंत पत्रकारांनी व्यक्त केली आहे. या पत्रकारांना लगाम लावण्यासाठी शासनाने वेळीच पुढाकार घेतला पाहिजे, अशी मागणी होत आहे.

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

(पूर्वी टॅरिफ सिने अँड फायनांस लिमिटेड म्हणून ज्ञात)

सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८

पंजिकृत कार्यालय: २८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भुलेश्वर, मुंबई ४००००२.

ई-मेल: spvglobaltrading@gmail.com, संकेतस्थळ: www.spvglobal.in

सप्टेंबर ३०, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

(रु. लाखांमध्ये)

अनु. क्र.	तपशिल	एकमेव						एकत्रिकृत					
		संपलेले त्रैमासिक			संपलेले अर्ध वर्ष		संपलेले गतवर्ष	संपलेले त्रैमासिक			संपलेले अर्ध वर्ष		संपलेले गतवर्ष
		३०-सप्टे-२० (अलेखापरीक्षित)	३०-जून-२० (अलेखापरीक्षित)	३०-सप्टें-१९ (अलेखापरीक्षित)	३०-सप्टे-२० (अलेखापरीक्षित)	३०-सप्टें-१९ (अलेखापरीक्षित)	३१-मार्च-२० (लेखापरीक्षित)	३०-सप्टे-२० (अलेखापरीक्षित)	३०-जून-२० (अलेखापरीक्षित)	३०-सप्टें-१९ (अलेखापरीक्षित)	३०-सप्टे-२० (अलेखापरीक्षित)	३०-सप्टें-१९ (अलेखापरीक्षित)	३१-मार्च-२० (लेखापरीक्षित)
१	कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ)	६६८.९४	०.५९	८८१.४०	६६९.५४	८८१.४२	३,००९.१२	१३,७४८.५५	६,३७९.१५	१३,६०७.८८	२०,१२७.७०	२४,४८३.३५	४५,८५६.७६
२	सामान्य कार्यामधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपूर्व)	३६.०७	(२.२०)	(१.२९)	३३.८८	(६.५३)	३६.३६	५३२.२५	(४०८.३१)	(०.८६)	१२३.९४	२८२.५९	१,२२५.६०
३	कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपश्चात)	३६.०७	(२.२०)	(१.२९)	३३.८८	(६.५३)	३६.३६	५३२.२५	(४०८.३१)	(३२७.३०)	१२३.९४	१५,६४८.४६	१६,५९१.४८
४	कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबींपश्चात)	३५.८६	(२.२८)	(१.२८)	३३.५९	(६.५१)	३६.४७	५०३.८०	(४२८.६३)	(४३१.६३)	७५.१७	१२,४२१.५९	१४,००२.८६
५	कालावधी/ वर्षासाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीसाठी एकत्रित नफा/ (तोटा) (कर पश्चात)	३६.१९	(२.११)	(१.२८)	३४.०९	(६.५६)	३६.३८	५०४.१३	(४२८.४६)	(४३१.६२)	७५.६७	१२,४२१.५५	१३,९८५.९७
६	सम भाग भांडवल (रु. १०/- प्रती भाग दर्शनी मूल्य)	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०	२४.५०
७	राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दाखविल्यानुसार	-	-	-	-	-	११२.३१	-	-	-	-	-	११,७८६.२९
८	प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबींपूर्व) (रु. १०/- प्रत्येकी) (वार्षिकीकरण नाही)												
	(ए) मूळ	१४.६४*	(०.९३)*	(०.५२)*	१३.७१*	(२.६५)	१४.८९	२०५.६३*	(१७४.९५)*	(४२.९३)*	३०.६८	(४४४.८)*	२०१.१३
	(बी) सौम्यिकृत	१४.६४*	(०.९३)*	(०.५२)*	१३.७१*	(२.६५)	१४.८९	२०५.६३*	(१७४.९५)*	(४२.९३)*	३०.६८	(४४४.८)*	२०१.१३
९	प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबींपूर्व) (रु. १०/- प्रत्येकी) (वार्षिकीकरण नाही)												
	(ए) मूळ	१४.६४*	(०.९३)*	(०.५२)*	१३.७१*	(२.६५)	१४.८९	२०५.६३*	(१७४.९५)*	(१७६.१७)*	३०.६८	५०७०.०४*	५,७१५.४५
	(बी) सौम्यिकृत	१४.६४	(०.९३)*	(०.५२)*	१३.७१*	(२.६५)	१४.८९	२०५.६३*	(१७४.९५)*	(१७६.१७)*	३०.६८	५०७०.०४*	५,७१५.४५

टिपा:

१. उपरोक्त निष्कर्ष हे सेबी (लिस्टिंग अँड ऑब्लिगेशन डिसक्लोझर रिक्वायरमेंटस), नियमावली, २०१५ च्या नियम ३३ च्या मान्यतेच्या अनुसार प्रसिद्ध करण्यात आले आहे आणि लेखा परीक्षण समितीद्वारे समीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे ०४ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये संमत करण्यात आले आहेत आणि संवैधानिक समीक्षकांच्याद्वारे मर्यादित समीक्षणावर आधारित आहे. ३१ मार्च २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षासाठीचा वित्तिय निष्कर्षाचा आराखडा www.bse.india.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.

२. वित्तिय निष्कर्ष कंपनी कायद्याच्या अनुसार इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड (इंड एएस) च्या अनुसार (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड), नियमावली, २०१५ (वेळोवेळी फेरफार करण्यात आलेले) आणि कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ च्या अंतर्गत अधिसूचित करण्यात आल्या नुसार तयार करण्यात आले आहेत.

३. करोना विषाणू (कोविड-१९) महामारीचा उद्रेक संपूर्ण जगभर झाला आहे आणि त्याचा भारतीय अर्थकारणावर महत्वाचा अडथला निर्माण झाला आहे आणि त्यामुळे अर्थकारण मंदावले आहे. समूहाचे प्रचालन आणि महसूल हे त्रैमासिकाच्या दरम्यान कोविड १९ मुळे प्रभावित झाले आहे. अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारामध्ये घेतना समूहाने कोविड १९ मुळे होणारा संभाव्य परिणाम विचारात घेतला आहे.

४. गत कालावधीमधील आकडे चालू कालावधीमधील आकड्यामध्ये मेळ घालण्यासाठी पुनर्गठीत, आवश्यकतेच्या अनुसार करण्यात आले आहे.

संचालक मंडळासाठी आणि त्यांच्या वतीने
एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड
सही/-
(बाळकृष्ण बिनानी)
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७५०८०

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०४ नोव्हेंबर २०२०